अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. २५ एप्रिल २०२५ । वर्ष : २३ वे अंक : २०६ वा किंमत : ५ रुपये पाने ८

## पहलगाम हल्ल्यात सुरक्षा यंत्रणांची चूक

**सर्वपक्षीय बैठकीत केंद्राची कबुली**

**नवी दिल्ली :** काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याने देश हादरून गेला असतानाच, केंद्र सरकारने या प्रकरणात पहिल्यांदाच सुरक्षेतील गाफीलपणाची कबुली दिली आहे. या हल्ल्यात २८ निष्पाप नागरिकांचा बळी गेला असून, एकही दहशतवादी वाचणार नाही, अशी ठाम भूमिका केंद्राने मांडली आहे.

गुरुवारी दिल्लीमध्ये झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी या हल्ल्याबाबत सविस्तर माहिती दिली. या घटनेत सुरक्षा यंत्रणांकडून चूक झाली असून तिचे गांभीर्याने परीक्षण सुरू आहे, असे त्यांनी स्पष्टपणे मान्य केले. बैठकीत उपस्थित सर्व पक्षांनी सरकारच्या कारवाईला पाठिंबा दर्शवला आणि दहशतवादाच्या विरोधात एकजुटीने लढण्याचे आश्वासन दिले. गेल्या काही वर्षांपासून जम्मू-काश्मीरमध्ये परिस्थिती स्थिर होती. पर्यटन, व्यवसाय आणि सामान्य जीवन सुरळीत सुरू होते. मात्र पहलगाम हल्ल्याने पुन्हा एकदा दहशतीचा चेहरा समोर आला. बैठकीत अनेक नेत्यांनी ही परिस्थिती बदलण्याची गरज अधोरेखित केली. हल्ल्यानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानविरोधात काही धोरणात्मक निर्णय घेतले.

# युद्धाची तयारी...

# मिसाईलच्या धमाक्याने पाकिस्तानची घाबरगुंडी

# विक्रांत युद्धनौका अरबी समुद्रात तैनात


## फायर जेट-अटॅक हेलिकॉप्टर सज्ज

**सोलापूर/प्रतिनिधी**

**जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचा हात असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर केंद्र सरकार पाकिस्तानच्या विरोधात मोठे पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. दुसरीकडे भारतातील हालचाली पाहून पाकिस्तानही भेदरला आहे. त्यामुळे घाबरलेल्या पाकिस्तानने काही घडण्याआधीच ग्वादर बंदराजवळ क्षेपणास्त्र डागण्याचा सराव सुरु केला आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनंतर भारतीय नौदलानेदेखील मोठे पाऊल उचलल्याची माहिती आता समोर येत आहे. भारताने अरबी समुद्रात गुरूवारी डेस्ट्रॉयर मिसाईलचा धमाका करून पाकला खणखणीत इशारा दिला आहे. या मिसाईल चाचणीने पाकिस्तानची नाडी टाईट झाली असून भारताकडून केव्हाही आपल्यावर हल्ला होईल, ही भीती तिथले सत्ताधीश आणि लष्करशाहीला लागली आहे. कायदेशीर व राजकीय स्तरावर पाकिस्तानची कोंडी केल्यानंतर, आता लष्करी पातळीवरही पाकिस्तानचे नाक-तोंड दाबण्याची भारताने तयारी सुरू केली आहे. याचाच एक भाग म्हणून भारतीय नौदलाने एक मोठी कामगिरी केली आहे.**


भारतीय नौदलाने स्वदेशी आयएनएस विक्रांत समुद्रात तैनात केले आहे. ओपन सोर्स इंटेलिजन्सने आयएनएस विक्रांतचे नौदल तळावरुन अरबी समुद्रात जातानाचे सॅटेलाईट इमेज समोर आणले आहेत. आयएनएस विक्रांतवर मिग-२९ फायटर जेट आणि अटॅक हेलिकॉप्टर सज्ज आहेत. पहलागमच्या घटनेनंतर भारताच्या कारवाईने घाबरलेल्या पाकिस्तानने ग्वादर बंदराजवळ क्षेपणास्त्र डागण्याचा सराव सुरु केल्यानंतर त्याला उत्तर म्हणून भारताने हे पाऊल उचललं आहे. तसेच भारतीय नौदलाने आयएनएस सुरतवरुन यशस्वी चाचणी केली आहे. विशेष म्हणजे नौदलाने स्वदेशी मार्गदर्शित क्षेपणास्त्र विनाशकाची यशस्वी चाचणी देखील केली आहे.

विक्रांत कर्नाटकातील नौदल तळावरून अरबी समुद्रात जात असतानाचे फोटो उपग्रहांनी टिपले आहेत. लवकरच भारत राफेल विमानांची खरेदी करणार आहे. पाकिस्तानने अरबी समुद्रात युद्धाचा सराव सुरू केला आहे. या सरावाला प्रत्युत्तर देण्यासाठी भारताने विक्रांत हे विमानवाहू युद्धपोत समुद्रात उतरवले आहे. या युद्धपोतावर मिग-२९के (-२९) लढाऊ विमाने आणि हल्ला करणारे हेलिकॉप्टर तैनात करण्यात आले आहेत. पाकिस्तानने ग्वादरबंदराजवळ क्षेपणास्त्रे डागण्याची तयारी सुरू केली आहे. तर भारताने देखील विक्रांतवर तैनात करण्यासाठी २६ राफेल विमानांची मागणी केली आहे. लवकरच या विमानांचा सौदा होणार आहे. ओपन सोर्स इंटेलिजन्सच्या मदतीने विक्रांतचे फोटो मिळाले आहेत. हे युद्धपोत कारवार नौदल तळावरून अरबी समुद्रात जात असताना दिसले. विक्रांत नेहमी गोवा जवळच्या कारवार तळावर असते.



डेस्ट्रॉयल मिसाईलची चाचणी गुरुवारी अरबी समुद्रात घेण्यात आली.

### विक्रांत किती शक्तिशाली?



विक्रांत हे युद्धपोत खूप शक्तिशाली आहे. ते भारतातच बनवले आहे. याची लांबी २६२ मीटर आणि रुंदी ५९ मीटर आहे. यावर ४० लढाऊ विमाने ठेवता येतात. यात जनरल इलेक्ट्रिकचे शक्तिशाली टर्बाइन आहेत. या युद्धपोतावर मिग २९ विमानांचे आणि १०-३१ हेलिकॉप्टरचे स्क्वॉड्रन आहेत. याची मारक क्षमता १५०० किमी इतकी आहे. यावर ६४ बराक क्षेपणास्त्रे आहेत, जी हवेत मारा करू शकतात. विक्रांत जगातील टॉप-१० युद्धनौकांपैकी एक आहे.

### भारत - पाकिस्तान यांच्यातील वाढला तणाव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी बैठक झाली. या बैठकीत पहलगाम हल्ल्याबाबत चर्चा झाली. बैठकीनंतर विदेश सचिव विक्रम मिस्री यांनी भारताच्या निर्णयांची माहिती दिली. भारताच्या भूमिकेमुळे पाकिस्तान भेदरला आहे. त्यामुळे त्यांनी अरबी समुद्रात युद्धाचा सराव सुरू केला आहे. थोडक्यात, पहलगाम हल्ल्यामुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव वाढला आहे. भारताने विक्रांत समुद्रात उतरवून पाकिस्तानला सडेतोड उत्तर दिले आहे.

## नशेत फिट्सच्या गोळ्या खाल्ल्याने मृत्यू

**सोलापूर :** दारूच्या नशेत फिट्स आजारावरील औषधी गोळ्या जास्त प्रमाणात खाल्ल्याने एका इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना शहरातील न्यू बुधवार पेठ येथे घडली. राजन भीमराव बनसोडे (वय ४०, रा. न्यू बुधवार पेठ, सोलापूर) असे मयताचे नाव आहे. त्याने ४ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास दारूच्या नशेत आजारावरील ८ ते १० गोळ्या एकाच वेळी सेवन केले होते. त्याला उपचारासाठी भीमराव (वडील) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले होते. उत्तरादरम्यान तो गुरुवारी पहाटे मयत झाला.

## भीमा कारखाना मल्टीस्टेट करण्याच्या प्रयत्नाला हरकत

**चार सदस्यांची उच्च न्यायालयात याचिका**

**मोहोळ/प्रतिनिधी**

तालुक्यातील भीमा सहकारी साखर कारखाना मल्टीस्टेट करण्याच्या प्रयत्नाला हरकत घेण्यासाठी ४ सभासदांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यावर कारखान्याचे संचालक मंडळ आणि शासनाच्या जबाबदार आधिकाऱ्यांनी आपले म्हणणे २५ जून रोजी सादर करावे, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले. गुरुवारी ही सुनावणी पार पडली.



भीमा कारखान्याचे चेअरमन विश्वजित महाडिक तसेच भाजपाचे खासदार धनंजय महाडिक यांनी सत्तेचा गैरवापर करून कारखान्याच्या संचालक मंडळाला व सभासदांना विश्वासात न घेता बेकायदेशीरपणे कारखाना मल्टीस्टेट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्याविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयामध्ये समाधान शेळके, पोपट शेळके, हनुमंत चव्हाण (टाकळी) आणि युवराज भोसले या चार जणांनी ॲड. महादेव चौधरी यांच्यामार्फत याचिका दाखल केली होती. त्याच्या सुनावणी दरम्यान हा आदेश दिला. चेअरमन विश्वजित महाडिक, खासदार धनंजय महाडिक आणि सर्व संचालक मंडळ तसेच केंद्र सरकारचे सहकार मंत्रालयाचे अधीक्षक, राज्य सरकारचे सहकारी संस्थांचे आयुक्त, त्याचबरोबर सोलापूरचे प्रादेशिक संयुक्त साखर संचालक अशा एकूण २१ जणांना प्रतिवादी करण्यात आले आहे या सर्वांनी आपले म्हणणे २ ५ जून रोजी सादर करावे न्यायालयाने दिले आहेत .

भीमा कारखान्यावर बेकायदेशीरपणे काही कोटी रुपये कर्ज चेअरमन विश्वजित महाडिक आणि खा. महाडिक यांनी काढले आहे. अद्याप कर्ज कुठल्याही स्वरूपात फेडण्यात आले नाही. त्याचबरोबर ही संस्था मल्टीस्टेट करायची असेल तर राज्य शासनाने घालून दिलेल्या ११ प्रकारच्या नियमांपैकी कुठल्याही नियमाचे पालन करण्यात आले नाही, असे याचितकेत म्हटले आहे. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. वैभव परशुरामे ॲड. महादेव चौधरी, ॲड. रणवीर चौधरी, ॲड. त्रिशा चौधरी यांनी काम पाहिले.

## बार्शी येथे सासूचे घर जाळले; जावयावर गुन्हा

**बार्शी/प्रतिनिधी**

पतीबरोबर पटत नसल्याने माहेरी येऊन राहिलेल्या आईचे घर जावयाने पेटवून आर्थिक नुकसान केले. ही घटना बार्शी येथील उपळाई रोडवर मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी बार्शीच्या पोलिसांनी जावयाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तो घटनेनंतर पसार झाला आहे.

यासंदर्भात नंदा महादेव गुट्टे (वय ४५ मूळ रा. बीड सध्या रा. उपळाई रोड, बार्शी) यांनी बार्शी शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी त्यांच्या जावई सुनील गणपत फड (रा. परळी, जि.बीड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. नंदा गुट्टे या बार्शी येथे राहून मजुरी करतात. त्यांची विवाहित मुलगी पतीबरोबर पटत नसल्याने काही दिवसापासून (बार्शी) येथे माहेरी येऊन राहण्यास आहे. वारंवार बोलावून देखील बायको येत असल्याने सुनील फड हा बुधवारी बार्शी येथे आला होता. तो आल्याचे समजल्यानंतर नंदा आणि त्यांची मुलगी घराला कुलूप लावून दुसरीकडे राहण्यात गेल्या होत्या. तेव्हा जावई सुनील फड हा रात्री येऊन घराचा दरवाजा उचकटून प्रापंचिक साहित्याला आग लावली. त्यात प्रापांचिक साहित्य जळून ४५ ते ५० हजाराचे नुकसान झाले. हा प्रकार घडल्यानंतर नंदा गोटे यांनी जावया विरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केली.

पुढील तपास हवालदार अडसूळ करीत आहेत.

## दुचाकी घसरुन चालकाचा मृत्यू; पत्नी जखमी

**सोलापूर :** वेगाने जाणाऱ्या दुचाकी समोर अचानक कुत्रा आल्याने दुचाकी घसरून चालक गंभीर जखमी होऊन मरण पावला. तर पत्नी जखमी झाली. हा अपघात सोलापूर ते विजापूर रोडवरील तेरामैल जवळ गुरुवारी सकाळच्या सुमारास घडला.



कैलास रामचंद्र कटप (वय ४९ रा.लक्ष्मीनगर भाग१, आकाशवाणी केंद्र जवळ, सोलापूर) असे मयताचे नाव आहे. ते गुरुवारी सकाळी ६ वाजेच्या सुमारास पत्नी विजयाबाई (वय ३८)यांच्यासोबत सोलापूर ते विजापूर असा दुचाकी वरून प्रवास करीत होते. वैष्णवी पेट्रोल पंपाजवळ अचानक कुत्रा आडवा आल्याने ते दोघे दुचाकीवरून कोसळून गंभीर जखमी झाले होते. त्यांना ॲम्बुलन्स मधून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले असता त्यापैकी कैलास कटप हे उपचारापूर्वी मयत झाले. या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




प्रत्येक वेळी योग्य मुद्दा सापडेलच, असे नाही!

| | |
|---|---|
| संगम श्री डे | 680-44-112 |
| संगम श्री नाईट | 359-72-570 |
| कल्याण | 299-08-459 |
| मुंबई | 568-90-226 |

## ज्या वळसंगकर हॉस्पिटलमध्ये मनीषा मानेची ‘बॉसगिरी’ चालली; तिथंच गळ्यात चपलांचा हार पडण्याची तिच्यावर नामुष्की ओढावली!

**सोलापूर/खास प्रतिनिधी**

**सोलापुरातील रामवाडी परिसरातल्या सुप्रसिध्द डॉ.वळसंगकर हॉस्पिटलमध्ये प्रशासन अधिकारी या मोठ्या पदावर मनिषा मुसळे-माने अनेक वर्षे राहिली. प्रशासन प्रमुख म्हणून तिनं इथं बॉसगिरी चालवली. इथल्या अनेक कर्मचाऱ्यांना बॉस म्हणून धारेवर धरलं. वट्ट हाणला. रुबाब दाखविला त्याच ठिकाणी तिच्यावर गळ्यात अक्षरश: चपलांचा हार पडण्याची भयानक नामुष्की ओढवली. पोलिसांच्या सतर्कतेमुळे तिच्यावर ओढावणारा अत्यंत दुर्दैवी प्रसंग टळला. या दरम्यान हॉस्टिलमधील कर्मचाऱ्यांच्या संतापाचा कडेलोट झाल्याचं दिसलं. हॉस्पिटलमध्ये वातावरण एकदम टाईट झालं. डॉ. वळसंगकरांच्या आत्महत्या प्रकरणाला वेगळं वळण लागता लागता राहिलं. गुरुवारी सायंकाळी इथं जे घडलं त्यातून ‘कालाय तस्मै नमः’चा साक्षात्कार झाला.**



सोलापूर : संशयित मनीषा मुसळे-माने हिला तपासाच्या पार्श्वभूमीवर, वळसंगकर रुग्णालयात आणल्यानंतर तिच्याविरुद्ध संताप व्यक्त करत थांबलेल्या कर्मचारी महिला.

- डॉ.वळसंगकर हॉस्पिटलमध्ये मनिषाची एंट्री, वातावरण एकदम टाईट
- संतप्तांकडून आरोपांचा भडिमार, अर्वाच्य भाषेत शिव्यांची लाखोली, चपलांचा हार
- शिरीष सरांच्या आत्महत्या प्रकरणाला वेगळं वळण लागता लागता राहिलं

त्याचे झाले असे की, प्रसिद्ध मेंदू विकार तज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येचा तपास सदर बझार पोलिसांकडून वेगात सुरु आहे. या घटनेमधील संशयित मनिषा मुसळे-माने हिला गुरुवारी सायंकाळी सव्वा सात वाजण्याच्या दरम्यान धमकीचा ई-मेल ज्या संगणकावरुन पाठविला होते ते स्थळ, संगणक जप्ती आणि इतर माहितीच्या अनुषंगाने, वळसंगकर हॉस्पिटलमध्ये सदर बझार पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी आणले होते.

यावेळी हॉस्पिटल परिसरात जमलेल्या काही माजी तसेच सध्या कामावर असलेले कर्मचाऱ्यांनी मनिषा हिला टार्गेट केले. तिच्यावर असंख्य आरोपांचा भडीमार करण्यासह तिला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करणे सुरु ठेवले. याशिवाय तिच्या गळ्यात चपलांचा हार घालण्यासाठी हे कर्मचारी पुढे सरसावले होते. मात्र संशयित मनिषाच्या चोहोबाजूंनी महिला पोलीस कर्मचाऱ्यांचं सुरक्षित कडं असल्याने चपलांचा हार गळ्यात पडता पडता ती वाचली.

दरम्यान यावेळी पोलिसांनी तपासाच्या दृष्टीने संगणकासह काही कागदपत्रे जप्त केल्याची माहिती पुढे आली आहे.

### लक्ष विचलित करण्यासाठी प्री प्लॅनिंग केल्याची कुजबुज

डॉ.वळसंगकरांच्या आत्महत्येला ‘गृहकलह’ कारणीभूत असल्याची चर्चा थांबता थांबत नाही, त्या दृष्टीने पोलिसांकडून तपास व्हायला हवा, अशी जोरदार मागणी कायम आहे. सोलापूरचं समाजमन तसं तयार झालंय. मात्र नागरिकांच्या आरोपानुसार, डॉ.वळसंगकरांच्या आत्महत्येप्रकरणी फक्त अन् फक्त संशयित मनिषा हिलाच खपविणं सुरु आहे. गृहकलह या विषयावरुन लक्ष विचलित करण्यासाठी आणि कुटुंबातील दोषी सदस्यांना वाचविण्यासाठी जाणीवपूर्वक काही ‘प्री प्लॅन’ राबवले जात आहेत, त्याचाच एक भाग म्हणजे संशयित मनिषा हिला चपलांचा हार घालून तिच्याबद्दल किती रोष आहे, हे दाखवायचे होते, अशी कुजबुज हॉस्पिटल परिसरात गुरुवारी रात्री उशीरापर्यंत होती.